बसायची खोली होती. दोन मोठे जनरल वॉर्ड होते आणि एक पार्टीशन टाकून दोन स्पेशल रुम्स केल्या होत्या. वेळेला बारा-पंधरा पेशंटस्‌ची सोय होत होती. मला आठवतं आहे काही वेळेला पेशंटस् वाढले तर आमच्या वरच्या कॉट पण खाली नेल्या जायच्या. त्यावेळेला डिलीव्हरी झालेल्या बायका १० दिवस हॉस्पिटलमध्ये राहायच्या. शक्यतो सिझरीन टाळली जायची. आतासारखीची सिझरीन सहज सोपी नव्हती. त्यावेळेला पेशंटच्या गरजेनुसार हॉस्पिटलमध्ये बारा-पंधरा डॉक्टर यायचे. डॉ. मंगेशीकर, डॉ. आपटे खूप वेळा सकाळी हॉस्पिटलमध्ये टॉन्सिलची ऑपरेशन्स् करायला यायचे. डॉ. परचुरे, डॉ. साठे हे स्त्रीरोग तज्ज्ञ होते. डॉ. जोगळेकर आय स्पेशालिस्ट होते. ते जवळ जवळ ४० वर्षेडोळे तपासून मोतीबिंदूचे ऑपरेशन करायचे. डॉ. ठक्कर, एक्सरे, डॉ. गांधी भूल द्यायचे आणि नंतर डॉ. रणदिवे ४० वर्षेभूल देण्याचे काम करीत होते. पहिल्यांदा दातांकरिता डॉ. साळुंके मग विजय ढवळे मग मोकाशी आणि आता ४५ वर्षेडॉ. शेजवलकर काम करीत आहेत.

पेशंटच्या गरजेनुसार डॉ. सुलाखे, डॉ. तिळपुळे, डॉ. खरे हे डॉक्टर पण यायचे. नंतर डॉ. डायस हे जनरल सर्जन येत होते. ते सगळ्या प्रकारची ऑपरेशन्स् फार छान करायचे. ७७ साली डॉ. बापट पण थोडे दिवस येत होते.

हॉस्पिटल चालू झालं १९५० साली. आम्ही त्यावेळी राहत होतो विजय निवास मध्ये. पेशंटस्‌च्या सोईकरिता बाबांनी ठरवलं की पेशंटला ताजं, सकस घरचं जेवण द्यायचं. ते जेवण आम्ही नारायण भुवन मध्ये हॉस्पिटलच्या वर ५४ साली राहायला येईपर्यंत विजय निवास मधून जेवणाचे डबे भरून येत असत. जेवणाच्या बाबतीत आई-बाबांचा कटाक्ष होता की, जेवण दोन्ही वेळेला ताजंच द्यायचं. सकाळचं जेवण रात्री नाही, रात्रीचं सकाळी नाही. अगदी ताकापासून दोन्ही वेळा सगळं ताजंच द्यायचं आणि आपण जे खाऊ तेच पेशंटला द्यायचं आणि हीच परंपरा आजतागायत चालू आहे.

आईच्या वेळेला कितीतरी वेळा स्वयंपाकाला माणूस नसायचा. तेव्हा पोळ्यांपासून सगळा स्वयंपाक आईच करायची. थोडे दिवस हॉस्पिटलचे कपडे पण आईनेच शिवले. तूप पण घरी कढवलेले पेशंटला भातावर दिले जायचे. जेवणाकरिता लागणारे लोणचे, पापड पण घरीच केले जायचे. नंतर हॉस्पिटलमध्ये काम करणाऱ्या मावशांना श्रावण महिन्यात सोमवारी घरी तयार केलेले लोणचं आई द्यायची. सिस्टर मावशांना प्रत्येक दिवाळीला साड्या द्यायची परंपरा आई-बाबांनी चालू केली. दिवाळीच्या पहिल्या दिवशी तो एक मोठा कार्यक्रम असायचा. फराळाची पुडी आणि साडी प्रत्येकाला दिली जायची. दिवाळीतले चार दिवसांचे फराळांचे पदार्थ पेशंटस्‌ना घरच्याघरी करून दिले जायचे. इथे आणखी एक गोष्ट सांगायला पाहिजे ती म्हणजे पेशंटस्‌ची ऑपरेशन्स् रात्री अपरात्री कधी पण करावी लागायची तेव्हा मुंबईचे डॉक्टर यायचे. मग त्यांच्याकरिता आई ताजा स्वयंपाक करायची.



पहिल्यांदा बाबांकडे गाडी नव्हती. बाबा सायकल वरती व्हिजिट्सना जायचे. पहिली काही वर्षेहॉस्पिटलचा स्टाफ बेताचाच होता. जवळजवळ १५ वर्षेहॉस्पिटलचं काम नारायण भुवनमध्येच होत होतं. हॉस्पिटल आणि गोखले रोडवरचा संजीवनी दवाखाना बाबा एकटेच चालवित होते.

नंतर मग १९६५-६६ मध्ये नारायण भुवनच्याच शेजारच्या जागेत जिथं बाबांनीच फुलझाडं, फळझाडं आणि भाजीपाला, केळी सगळं आवडीने लावलं होतं. नंतर मग काही वर्ष ते काम बाळूकाकाकडे सोपवलं होतं. ती सर्व जागा साफ करून तिथे शिवशक्ती नावाचं नवीन हॉस्पिटल बांधलं आणि हॉस्पिटलचे काम केलं.

१९६६ नंतर हॉस्पिटल अद्ययावत झाले. संजीवनीतील संध्याकाळची ओ. पी. डी. (O.P.D.) शिवशक्तीत चालू झाली. १९७४-७५ साली डॉ. विजय हॉस्पिटलचे काम पाहू लागला.

बाबांनी त्यांचं काम कमी केलं. बाबांनी ३० वर्षेदवाखाना - हॉस्पिटलचे काम एकट्यांनी सांभाळलं. २००३ पर्यंत सकाळची ओ.पी.डी. (O.P.D.) ते पाहत होते. डॉ. विजयनी ३० वर्षेशिवशक्ती मधलं हॉस्पिटल आणि ओ. पी. डी. (O.P.D.) सांभाळली. सन २००४ पासून डॉ. महेश हॉस्पिटलचं काम पाहू लागला.

माझी आई हॉस्पिटलमध्ये जाऊन पेशंटस्‌शी संवाद साधत असे. काय हवं नको त्याची विचारपूस करत असे. आई पेशंटस्‌ना मानसिक धीर देत असे. त्यावेळेला आमच्या सर्व नातेवाईकांत बाबा एकटेच डॉक्टर होते. त्यामुळे आत्या, काकू, मामी डिलीव्हरीच्या वेळी आमच्याकडे येत असत. आई स्वतः त्यांच्याबरोबर उभी असायची. या कामात आजीचा पण पुष्कळ हातभार असायचा.

आणि पुढे आईचाच वारसा सुमेधाने चालू ठेवला आहे. पेशंटस्‌ना काय हवं नको ते ती बघते. सकाळचा नाष्टा, दुपारचा नाष्टा, पेशंटस्‌च्या नातेवाईकांची जेवणाची सोय हे सर्व उपक्रम तिनेच चालू केले आहेत.

आता २००० सालापासून पुन्हा हॉस्पिटलचे रूप पूर्ण बदलले आहे. नव्या दमाचे डॉक्टर, महेश -अपर्णा, आनंद-श्रुती, बदलत्या काळाप्रमाणे परिस्थितीप्रमाणे नवीन उपचार पद्धतीप्रमाणे हॉस्पिटलचे सगळे रूप पालटणे आवश्यक होते. त्याप्रमाणे हॉस्पिटलचे बाह्यरूप बदलले. हॉस्पिटल नव्या रुपात नव्या पद्धतीने बांधलं गेलं. डॉ. महेश ह्यांची ओ. पी. डी. (O.P.D.) वेगळी, सोनोग्राफी रुम वेगळी, अद्ययावत तपासणी रुम, (ब्लड) रक्त तपासणी, टेस्ट ट्यूब बेबी पद्धतीची रुम अद्ययावत. स्त्रियांच्या शारीरिक सर्व तपासण्या होऊ लागल्या.

डॉ. आनंद बालरोग तज्ज्ञ आहे. जन्मल्यापासून १८ वर्षांपर्यंत सर्व दुखण्यांवर तो उपचार करतो. त्याच्या देखरेखीखाली अगदी लहान बाळांची ऑपरेशन्स् पण केली जातात. तसंच अतिदक्षता विभागात बालकांच्या डोळ्यांची तसेच कानांची तपासणी केली जाते. लहान बाळापासून मोठ्या बाळापर्यंत ॲडमिट करून घेऊन त्यांच्यावर उपचार केले जातात. तसेच मुलांचा बुध्यांक तपासला जातो. अपर्णा महेशच्या हॉस्पिटलचे

व्यवस्थापन बघते, पेशंटस्‌चे रेकॉर्ड व्यवस्थित ठेवते. हॉस्पिटलचे ऑडिट व्यवस्थित ठेवायचे काम, काही कायदेशीर बाबींचं काम पण ती बघते. तसेच हॉस्पिटलची स्वच्छता, पेशंटस्‌च्या अडचणी या सर्व गोष्टींकडे ती नीट लक्ष पुरवते. तसेच मावश्या व सिस्टर यांच्या कामावर तिचं चोख लक्ष असतं.

तसेच श्रृतीने हॉस्पिटलचे NICU चे व्यवस्थापन अगदी उत्तम ठेवले आहे. त्याकरिता हॉस्पिटल व्यवस्थापन या विषयी पदवी घेतली आहे. तसेच स्तनपान व बालआहार विषयी सल्लागार म्हणून ती काम करते आहे.

आता महेशच्या आय्.व्ही.एफ (IVF) टेस्ट ट्यूब बेबी सेंटरला जून - २०१८ मध्ये पाच वर्ष पूर्ण होतील.

हॉस्पिटलच्या या यशस्वी वाटचालीत तिथे काम करणाऱ्या कर्मचारी वर्गाचेही फार मोलाचे योगदान आहे यात शंका नाही. म्हणूनच दरवर्षी हॉस्पिटलची तपासणी म्हणजे आय्.एस्.ओ. (I.S.O.) होते. चांगल्यापैकी गुण दिले जातात. आमच्या हॉस्पिटलमध्ये ४०/५० वर्षांपासूनचे काम केलेल्या मावश्या-सिस्टर आहेत. नाव कोणाकोणाचं घेऊ. अगदी सुरुवातीला लोहकरे सिस्टर, पुराणिक सिस्टर, सावंत सिस्टर, वाघ सिस्टर, खटावकर, उतेकर, गोरे आणि देशमुख अजून ४०-४५ वर्षेचांगल्या प्रकारे काम करीत आहेत. पहिल्या मावशा आता निवृत्त झाल्या आहेत. काळाच्या पडद्याआड गेल्या आहेत. या सगळ्यांनी हॉस्पिटल आपलंच आहे असं समजून काम केलं आहे.

आज बाबांनी हॉस्पिटलचे हे वैभव पाहिले असते तर त्यांना अतिशय आनंद झाला असता, समाधान वाटलं असतं. बाबा बाहेरगावी गेल्यावर प्रत्येक वेळेला या मावशांकरिता, सिस्टरांकरिता काहीतरी घेऊन यायचे. तिच परंपरा आता अपर्णा-श्रृती चालवत आहेत.

अशा प्रकारे बाबांनी जे रोप लावून त्याची मशागत, जोपासना केली. रक्ताचं पाणी करून सेवेकरिता आपलं फार मोलाचं योगदान दिलं. तोच त्यांचा वसा पुण्यकर्म म्हणून पुढची पिढी निष्ठेने पुढे नेत आहे.

**– शैलजा बेडेकर**





शैलजा बेडेकर नातवंडां समवेत

Dr. Vijay Bedekar with his wife Mrs. Sumedha Bedekar
and two sons Dr. Mahesh and Dr. Anand





# Dr. Vijay

Dr. Vijay Bedekar, second child of Dr. V. N. Bedekar was born on 9th October 1947, just two months after independence. As a child, he was boisterous, lively and social. He would be friendly with young and old irrespective of their age. In those days one of our tenants, Shri Deshpande, had returned from Africa after his retirement. Vijay would exchange stamps with him and enjoy his company. Young Vijay would often visit Dr. M. D. Paradkar, the Sanskrit scholar who resided in Narayan Bhuvan in those days. As a young child of six or seven years he would perform very good acrobatics. He was a good orator since school days. He had participated in many elocution competitions and won prizes. He was a good actor too and brought laurels to his school in inter school drama competitions. He was fun loving and would play pranks and make others laugh. Later, he joined Belgaum Medical College (Karnataka, India) and there too he was popular. He was bold and had leadership qualities. He contested election in medical college and won it. Dr. Vijay would generously help people and friends in need. Dr. Vijay was very attached to his uncle and aunt, नाना मामा - मामी (Shri Shrinivas Joshi and Sou. Ratnaprabha Joshi), and the bond of love and respect remains forever. His father Dr. Bedekar used to be very busy, so during summer vacation Dr. Vijay and his sisters would always go to their uncle's home at Dadar and enjoy holidays. It was like their second home. After securing his M.B.B.S degree from Belgaum Medical College, he came back to Thane. He obtained Post Graduate Diploma from Wadia Maternity Hospital in Mumbai. He started general practice with his father. Although it was difficult in the beginning, eventually he won the confidence of his father's patients. He renovated the theatre and also brought many new changes in the practice to keep up with the time.



ज्ञानकण वेचता वेचता

On 18 th October, 1973, Dr. Vijay Bedekar was married to Sucheta Vaze daughter of Dr. Mukund R. Vaze and Sou. Vasumati M. Vaze from Bhiwandi. Sucheta was liked by all in Bedekar family as she was a good looking girl, bubbling with energy and enthusiasm. She was well versed with the norms of behaviour in a joint family as Dr. Vijay's seventy five year old grandmother was also very active in those days. Sumedha (nee Sucheta Vaze) was, and continuous to be, a perfect host to people from all walks of life and to Dr. Vijay's friends, who often visit their home. For forty-four years now, she is successfully managing the hospital and home. With her busy schedule, she also pursues her hobbies of learning classical music, drawing and painting. Since last couple of years she is conducting Sanskar Bharti classes for young children. The couple is blessed with two children Dr. Mahesh - the elder son is a gynaecologist, while the younger son, Dr. Anand, is a Pediatrician. Both of them are very well established in their respective practice. The most outstanding facet about Bedekar family is Dr. Vijay and Sou. Sumedha Bedekar, their two sons with their families and his physically handicapped sister live together under one roof. It is very rare to find this in the present era of 'Nuclear Families'. They live amicably; enjoy, respect each other at the same time have their own space in the family. Dr. Vijay Bedekar assumed office as Chairman VPM (Thane), in 2004, following the sad demise of his father. He has taken VPM (Thane) to new heights. Like his father he also gave birth to few Social and Cultural organisations like Institute for Oriental Study, Thane, The Museum Trust of West Coast of India, Thane, Satya Shodh Sanstha (organisation in search of truth) and Prajnya Praman Manch (forum for excellence in wisdom), to name a few. He is a crusader against corruption. He fought court battles to protect Cultural Monuments. Like his father, Dr. Vijay also worked with his selfless associates like Drs. Ulhas Vaidya, Kishore Chitnis, R. R. Randive, Jayant Shringarpure and Sarva-Shri M. Y. Gokhale, Uttam Joshi, Prakash Vaidya, Vilas Sangurdekar, Jagdish Pradhan, Jayant Kayal, Dhopate, Korde and many more. All of them share Dr. Vijay's vision, disciplined approach, and upcoming commitment and devotion towards their work.

# Institute for Oriental Study, Thane







Thane was a city with a growing population of middle class and had no facilities, for academic and research activities, in Oriental Study, unlike Mumbai or Pune. It was Dr. Vijay's penchant passion for research in Oriental Study in the field of History, Culture and Sanskrit which led to the formation and establishment of the Institute for Oriental Study, Thane in 1984.

Dr. Vijay was lucky to get guidance of great scholars like Prof. Dr. M. D. Paradkar and Sarv-Shri S. B. Velankar, G. K. Bhat and many more from across length and breadth of India. It has completed thirty-three years. It is a voluntary organization working for promotion of Indian Culture and Sanskrit language and preservation of Indian Heritage. The institute has conducted several seminars on various facets of Indian Culture - to name a few, Sanskrit outside India, Paninian Grammar and Science and Technology in Hindu tradition. Study tours were conducted to Tamil Nadu, Gujarat (including Kutch), Karnataka, Orissa etc. Teams of scholars also attended conferences outside India and also visited libraries, museums and old monuments in foreign lands. The institute arranged four exhibitions for the benefit of its members and the general public. The institute is running a reference library from 1985. It possesses 40,000 volumes relating to history, culture, language, art, 3000 Sanskrit manuscripts, and many sculptures and rare artefacts. When Dr. V. N. Bedekar initiated the formation of Thane Bharat Sahakari Bank, Thane in 1979, Dr. Vijay played an active role in the same. He was the Founding Member and Director of the said bank. Later on, he became Chairman of Thane Bharat Sahakari Bank for five years (1993-98). He started Bharat Grahak Peth (Indigenous store for consumable purchase and sale) with the idea that all stationary, other accessories and products of day to day utilities would be available at reasonable price to all schools and colleges of VPM (Thane). He also started Disha Magazine for VPM (Thane) in July, 1996. Dr. Vijay Bedekar is very dynamic like his father and has taken, and continues to do so, VPM (Thane) to greater heights. He is flexible yet firm, assertive but compassionate, most important qualities required to run a renowned and premier institute like VPM (Thane). Under the able leadership and guidance of Dr. Vijay, VPM's (Thane) Group of Institutions are well poised and postured to cater the needs of present times and also provide state of art infrastructure to provide quality and value based education. Jnanadweep (Knowledge Island) the college campus of VPM (Thane) is well equipped with, independent college buildings, libraries, internet connection, independent auditoriums. The entire campus is interconnected with Fibre Optic Network and has twenty four hour access to internet via leased lines. VPM (Thane) has its own website to access anywhere in the world.

VPM (Thane) arranges visits of students and teachers to Oxford, London and Cambridge and teachers from UK and China have visited VPM's (Thane) Schools and Colleges. The annual convocation ceremony is held on Teachers day i.e. 5 th September when certificates for VPM's (Thane) Autonomous Programmes are awarded to successful candidates, at the hands of distinguish dignitaries who are invited as Chief Guest for the function. Further, on the occasion of the memorial day (14 th April), of its past president Dr. V. N. Bedekar, renowned experts are invited to speak on specific themes relating to cultural, social, economic, science and technology subjects. The above activities are managed by VPM's (Thane) Group of Institutions under the professional guidance, support and encouragement of Dr. Vijay Bedekar who has emerged as a visionary and is rightly identified as **'Chip Off the Old Block'.**



पंचजनांची प्राच्यविद्या



# VPM's Maharshi Parshuram College of Engineering (MPOCE), Velneshwar, Guhagar, Ratnagiri (Maharashtra, India)

VPM (Thane) established an engineering college since 2012, in the interiors of rural area of Maharashtra, India with the state-of- the-art infrastructure spreading over thirty five acres of land at Velneshwar, sixty kilometers away from Chiplun, on Mumbai Goa Highway. Velneshwar is a beautiful quiet village, famous for its picturesque white sand beach fringed with coconut palms. It is a mega project of Rupees One Hundred and Fifty Crores. The campus has five engineering faculties. Today (2017), there are six hundred and seventy four students on roll, as against just ninety-four students when the college started in 2012. It has six academic buildings. When fully completed, the project will have ten hostels, twin bungalows for the Principals and the head of the departments, ten staff quarters for teaching and other administrative staff. The campus will have one electric substation, one central server room, one sewage treatment plant (STP) and one water tank. The several new buildings to emerge will house many novel state-of-the-art, learning disciplines, depending on the need as well as availability of resources. The Velneshwar campus has created job opportunities for at least thousand people and also indirect job employment and self-employment opportunities to many. It is a spacious educational township as per requirements of AICTE, New Delhi, with all amenities such as gymnasium, community hall, playgrounds, canteen, guest house and building for shop, bank, laundry and dispensary. It is a township equipped with all amenities. It will be one of the best colleges in India and can be compared with any Indian Institute of Technology. It is the dream project of the Chairman Dr. Vijay Bedekar. For the first five years, from February 2010 he has visited the project every week and continues to do so regularly. He is a perfectionist and does not like to compromise. Quality of work is well maintained under his supervision. He has inherited the legacy of his father. He has tremendous energy, will power and courage. He is not intimidated by difficulties, adversaries and obstacles. Dr. Vijay has done outstanding work in the field of education and undoubtedly is a 'persona exemplary' par excellence for successive generations of Bedekar family and to all others who have seen him functioning as Chairman, VPM (Thane).






# Mrs. Sumedha Bedekar



## सृजन-यज्ञ

आनंदी राहणं हा माणसाचा स्वभाव आहे. फक्त भौतिक सुख आणि अखंड संपत्ती असेल तरच माणूस सुखी होतो असं नाही. तर या सोबतच निरोगी शरीर ही देखील माणसाच्या मुलभूत गरजांपैकी एक गरज बनली आहे. छोटे-मोठे आजार बरे करण्यासाठी पूर्वीच्या काळी आजीबाईचा बटवा असायचा. काळ बदलला. विज्ञान प्रगत झालं. तसा आजीबाईचा बटवा हरवला आणि प्रगत वैद्यकशास्त्राने आपला प्रभाव दाखवायला सुरुवात केली. अगदी पूर्वी अनुभवी सुईणींच्या मार्गदर्शनाखाली घरातल्या घरात बाळंतपण व्हायचं. आजीबाईचा बटवा जसा हरवला तशा या सुईणीही काळाआड गेल्या आणि त्याजागी Maternity Hospitals आली. सुईणीची जागा प्रसूती-तज्ज्ञाने घेतली.

बदलत्या काळानुसार आता बाळ-बाळंतिणीच्या सुरक्षिततेसाठी अशी प्रसूतिगृह ही गरज झाली आहे. हे सारं विस्तारानं सांगायचं कारण एवढंच की अशाच एका प्रसुतिगृहाशी माझा आयुष्यभराचा संबंध आला. योगायोग म्हणजे मी १०-१२ वर्षांची असताना आईने दिलेला दुधाचा किंवा खिरिचा कडिचा डबा शेजारीच असलेल्या प्रसूतिगृहात ओळखीच्या बाळंतिणीला आवश्यक खाऊ म्हणून नेऊन द्यायचे. पुढे हेच भाग्य मला सासरी रोज लाभत आहे. असो.

खरं म्हणजे वैद्यक व्यवसायात असणाऱ्या घरातच माझा जन्म झाला. माझे वडील डॉ. मुकुंद रामचंद्र वझे आणि डॉ. वा. ना. बेडेकर हे स्नेही. अशाच एका भेटीप्रसंगी डॉ. बेडेकरांच्या कुटुंबीयांनी मला पाहिलं होतं (फक्त डॉ. विजयराव सोडून). त्यांनी माझ्या वडिलांकडे; 'ही मला सून म्हणून पसंत आहे' असं म्हटलं आणि घरगुती पाहाण्याचा समारंभ होऊन, खरंच मी १९७३ साली कु. सुचेता मुकुंद वझेची सौ. सुमेधा विजय बेडेकर झाले. डॉ. वा. ना. बेडेकर यांचं प्रसूतिगृह आणि घर 'शिवशक्ती' या इमारतीत आहे. माझा वैद्यक व्यवसायाशी थेट संबंध नसला तरी वडील, भाऊ, बहीण, सासरे आणि यजमान हे सारे डॉक्टर. आणि त्यातही 'डॉक्टरची पत्नी डॉक्टरीण' या न्यायाने मी डॉक्टरीण झाले! कोकणातून मुंबईत येऊन स्थायिक झालेले माझे सासरे डॉ. वा. ना. बेडेकर हे खरं तर व्यावसाईक कुटुंबातले, उत्तम परिस्थितीतले. पण अचानक स्वतःच्या कोळशाच्या वखारी आणि साखरेची गलबतं असलेल्या या व्यापारी कुटुंबानं आपला धंदा बुडीत जाताना अनुभवला. अनेकांचं देणं झालं. एकत्र कुटुंब असल्यामुळे गरजाही खूपच होत्या. तशातच डॉ. वा. ना. बेडेकरांचे वडील (माझे आजेसासरे – नारायण बेडेकर) डायरियानं गेले. घरातील प्रत्येकजण उदरनिर्वाह शोधत होता. काही मुले शिक्षणासाठी मुंबईला गेली; तर आईचा लाडका विद्याधर अर्थात डॉ. वा. ना. बेडेकर मॅट्रिक झाल्यानंतर आईनं दिलेले ५ रुपये घेऊन पुण्याला गेले. वडिलांच्या आजारपणात त्यांना सेवा देण्यासाठी डॉक्टर झाले, परंतु शेवटी यश आले नाही. ही सल मनात असल्याने निघताना त्यांनी मनाशी एक निश्चय केला आता मी डॉक्टरच होणार. खरोखरच आईचं लाडाचं

'विद्याधर' हे नाव सार्थ करत त्यांनी डॉक्टरकीची पदवी संपादली. दृढ निश्चय आणि अफाट मेहेनत यामुळेच त्यांना हे शक्य झालं. त्यानंतर ठाण्यात आपली वैद्यकीय प्रॅक्टिस सुरू केलेल्या डॉक्टरांनी रुग्णांचा विश्वास संपादन केला. वैद्यकीय व्यवसाय हळूहळू वाढू लागला आणि डॉ. वा. ना. बेडेकरांनी पुन्हा आर्थिक वैभव प्राप्त केलं. दरम्यान संसार फुलला होता. मुले शाळेत जाऊ लागली होती. पूर्वीच्या काळी घरी जाऊन तपासणी केली जात असल्यामुळे असेच एकदा डॉक्टर व्हिझिटला गेले होते. तेथून घरी आल्यावर त्यांना कळले की आपण जिथे गेलो होतो तेथेच बाजूला असलेल्या गोठ्यात शाळा भरते आणि आपली मुले त्याच शाळेत जातात. त्यांना खूप वाईट वाटले. शाळाचालकांनी डॉक्टरांचं सहकार्य मागितलं. डॉक्टरांनी मनावर घेतले आणि अनेकांचं सहकार्य घेत डॉ. बेडेकर १९५७ मध्ये विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष झाले. त्यांनी संस्थेला सर्व प्रकारची आर्थिक, नैतिक मदत केली. शाळेची नविन इमारत तयार झाली. शाळेला डॉ. बेडेकर विद्या मंदिर असे नाव देण्यात आले. आता स्वतःचा दवाखाना आणि ही शाळा अशा दुहेरी जबाबदारीनं डॉक्टर कामाला लागले. साधी राहणी आणि उच्च विचारसरणी हे त्यांच्या जीवनाचं जणू ब्रीदवाक्य होतं. विद्यार्थी, पालक, दवाखान्यातील बाळंतिणी आणि त्यांचे नातेवाईक, तसेच घरातील पाहुणे या सर्वांशी डॉक्टर खूप प्रेमानं वागत. या सर्वांची काळजी घेणं हे काम माझ्याकडं होतं आणि मीही ते आवडीने करत होते. अर्थात हा वारसा मला सासूबाई (सौ. वत्सला वा. बेडेकर) यांच्याकडून लाभला. आपल्या दवाखान्यात बाळंतपणासाठी आलेली स्त्री ही जणू आपल्या घरातलीच सदस्य आहे असं समजून माझ्या सासूबाई त्यांना काय हवं नको ते पाहत असत. सकाळच्या चहा पासून ते रात्री झोपताना दुधापर्यंत साऱ्या गोष्टी घरातूनच पुरवल्या जात असत. केवळ खाणं-पिणंच नव्हे तर लहानग्या बालकांसाठी झबली टोपडी शिवून देणं हे कामही माझ्या सासूबाई प्रेमानं आणि आनंदानं करत असत. माझ्या सासुबाईंना त्यांच्या सासूबाई (सावित्री नारायण बेडेकर - माझ्या आजे सासूबाई) मदत करत असत. भाजी मंडईतून भाजी आणणे, पोळ्या करणाऱ्या बाईं बरोबर बसून पोळ्या मोजणे अशा छोट्या-मोठ्या कामांतून त्यांची



चि. महेश ह्यांच्या मांवद्याचा पणजीचा आशीर्वाद



मदत होत असे. माहेरची शिकवण तसेच आजे-सासूबाई आणि सासूबाई यांच्याकडून जणू दुसऱ्यांसाठी सतत काहीतरी करण्याचा वसा वारसा म्हणून मला लाभला. मग मीही माझ्या परीने यात वेगळं, अधिक चांगलं काय करता येईल असा विचार करू लागले. ५ ते ८० व पुढे १०० या वयोगटातील सदस्यांनी भरलेलं आमचं कुटुंब. त्यामुळे सर्वांच्या आवडी-निवडींचा विचार करून घरात पदार्थ बनत होते. हेच पदार्थ दवाखान्यातही सर्वांना द्यावे असा विचार माझ्या मनात आला आणि मी तो अमलातही आणला. त्यामुळे दवाखान्यातल्या बाळंतिणी तर खुष झाल्याच पण त्यांच्यासोबत असणाऱ्या त्यांच्या नातेवाईकांची सोय झाल्याने तेही आनंदी झाले. आता माझा हुरूप वाढला. दवाखान्यातल्या वैद्यकीय सेवेव्यतिरिक्तच्या अन्य गोष्टीतही लक्ष घालायला सुरुवात केली. हॉस्पिटल मधील स्टाफला त्यांच्या घरी उपयुक्त ठरतील अशा वस्तू भेट म्हणून देणं, दिवाळीचा आनंद वाढवण्यासाठी सर्व सिस्टर्स आणि मावशीबाईंना प्रत्येकी ३-३ साड्या देणे, फराळ देणे, पावसात सर्व स्टाफला छत्री देणं या गोष्टी करत असू. त्या सर्वांच्या चेहेऱ्यावरील आनंद पाहून मलाही खूप समाधान वाटायचं. एकूणच स्टाफशी आमचं एक जिव्हाळ्याचं नातं निर्माण झालं. त्याचा परिणाम हॉस्पिटल मधील रुग्णसेवेवरही झाला. बेडेकर सुश्रुषालय हे ठाण्यातील अग्रगण्य आणि मानांकीत हॉस्पिटल ठरलं त्यात माझा हा खारीचा वाटा होता याचंच मला समाधान आहे. इंदुमावशी, सुभद्रा मावशी, चंद्रभागा, निर्मला, लक्ष्मी, लीलाबाई आणि मालशे या केवळ स्टाफ नव्हत्या तर बेडेकर परिवाराच्याच सदस्य होत्या. डॉक्टर म्हणून आमचं रुग्णांशी निर्माण होणारं नातं या वाढीव परिवारामुळे अधिक दृढ झालं. तीच परंपरा आजही कायम आहे. येणाऱ्या नवीन स्टाफलाही जुन्या स्टाफकडून हा वारसा प्राप्त होतोय.



आमच्या घराचे गोकुळ

या दरम्यान महेश आणि आनंद ही दोन्ही मुलं वैद्यकीय शिक्षण पूर्ण करून या व्यवसायात आले. त्यामुळे ३ पिढ्यांचा वैद्यकीय व्यवसाय असणाऱ्या या घराची मी एक साक्षीदार सदस्य आहे. ३ पिढ्यांतील वैचारिक वेगळेपण मी जवळून अनुभवलं. माझे सासरे सकाळी ९ ते रात्री ११ अशी कायम रुग्ण-सेवा देत असत. प्रसूती व्यतिरिक्त अन्य रुग्णांचाही यात राबता असे. या सोबतच त्यांच्या सामाजिक आणि राजकीय क्षेत्रातील मित्रमंडळींचा पाहुणचार करण्यातही मला आनंद वाटत असे. माझ्या यजमानांनी (डॉ. विजय बेडेकर) रुग्णसेवा तर

केलीच पण त्यांना प्राच्य विद्या संशोधनाची, शिक्षण क्षेत्राची आवड असल्यामुळे यामध्येही त्यांनी वेळ द्यायला सुरुवात केली. अर्थातच समाजातील विविध क्षेत्रांतील नामांकित मंडळी जोडली जात होती. डॉ. विजय यांनी १९७५ साली हॉस्पिटलची जबाबदारी स्वीकारली. वैद्यकीय क्षेत्रात आपल्या प्रामाणिक मेहेनतीने उत्तुंग नाव मिळवलेल्या डॉ. वा. ना. बेडेकर यांचा वारसा पुढे चालवणं हे एक आव्हान होतं. पण वडिलांच्या संस्कारामुळेच त्यांनी ते लीलया पेललं. आईकडून ५ रुपये घेऊन मनातल्यामनात तिला शब्द देणारे आणि त्याप्रमाणे डॉक्टर झालेले डॉ. वा. ना. बेडेकर, तर आईच्या शब्दाचा मान राखून तिच्या इच्छेनुसार डॉक्टर झालेले डॉ. विजय बेडेकर या दोघांतही हाच समान धागा जाणवतो. म्हणूनच वडिलांच्या पावलावर पाऊल ठेवून डॉ. विजय बेडेकर यांनी हॉस्पिटल आणि शाळा सांभाळतानाच महाविद्यालयाचीही जबाबदारी पेलली आणि स्वतःची नाममुद्रा असलेलं अभियांत्रिकी महाविद्यालय सुरु केलं (महर्षी परशुराम अभियांत्रिकी महाविद्यालय, वेळणेश्वर). आपल्या कामात, अभ्यासात आणि वाचनात रमणारे डॉ. विजय बेडेकर हे विविध क्षेत्रांतील माणसांच्या सहवासात रमतात. अशा अनेक दिग्गज व्यक्तींचा सहवास, त्यांचे आदरातिथ्य करण्याचा मान मला लाभला. घरी पाहुण्यांचा राबता आणि खाली पेशंट्सची जेवणं इत्यादी करताना ही ४०–४४ वर्षे कशी सरली हे कळलंच नाही. घरचे व दारचे वेगळेपण न राहता आपुलकी, आदरातिथ्य सहजच होत राहिलं. त्यामुळे व्यवस्थितपणा, आवरा–आवरी, विवेकाने नीटनेटकेपणा, हातात हात घालून सराईतपणे होत होते. माझी मुलेही रुग्णसेवेला प्राधान्य देत असतानाच सामाजिक बांधिलकी जपत दक्ष नागरिक होऊन चुकीच्या प्रथा–परंपरांविरुद्ध आवाज उठवताना पाहते तेव्हा मला समाधान वाटतं. माझे सासरे L.C.P.S., D.G.O होते. माझ्या यजमानांनी त्या पुढे वैद्यकीय शिक्षण घेत MBBS and DGO या पदव्या प्राप्त केल्या; तर माझ्या दोनही मुलांनी Masters in Doctor ही पदवी घेतली. महेश Gynac Specialist तर आनंद Neonetologist झाला. माझ्या मुलांनीही डॉक्टर व्हावं अशी माझीही इच्छा होती. मुलं लहान असताना एकदा घरी काही पाहुणे आले होते. कामानिमित्त बाहेर गेलेल्या मला घरी यायला थोडा उशीर झाला. तोपर्यंत महेशने हॉस्पिटलपासून आलेल्या सर्वांसाठी स्वयंपाकही केला होता. मला खूप कौतुक वाटलं. असंच एकदा आजोबांचे राजापूरचे सहकारी घरी आले. मला बाहेरगावी जायचे असल्यामुळे, 'या सर्वांना हॉटेल मध्ये जेवायला घेऊन जातो' असं माझे सासरेच मला म्हणाले होते. पण तेव्हा आनंद मला येऊन म्हणाला, 'आई, आजोबा हॉटेल मध्ये जेवायला जाणार नाहीत. तेव्हा तूच घरी व्यवस्था करून जा. त्यासाठी लागेल ती मदत आम्ही करू.' त्याचा हा आग्रह मला आवडला. आदरातिथ्याचा हा संस्कार या दोन्ही मुलांना त्यांच्या वैद्यकीय क्षेत्रातही कामाला येतो आहे, हे सात्विक समाधान आम्हा उभयतांना मिळते.

वैद्यकीय व्यतिरिक्त अन्य क्षेत्रांतही रुची असणाऱ्या या तीनही पिढ्यांनी कुटुंब जपत कौटुंबिक स्वास्थ्य घेतलं आणि दिलं. कुटुंब ही एक संस्थाच आहे, याला नक्कीच महत्त्व दिलं जात होतं आणि हल्ली आम्ही सर्व, तीनही पिढ्या एकत्रच नांदतोय. असं पाच पिढ्यांत राहण्याचं खरं वैभव, समृद्धी आम्ही दोघं अनुभवत आहोत.



माझ्या सासूबाई, स्वतः मी आणि माझ्या दोनही सुना हीसुद्धा तीन पिढ्यांचीच परंपरा म्हणावी लागेल. आनंदाचा मार्ग पोटातून जातो, तशीच पाळण्याची दोरी आईच्या हातांत आहे असं म्हणतात. या गोष्टीचा योग्य तो वापर करून सासूबाईंनी लावलेल्या रोपट्याचं खत, पाणी घालून वृक्ष बनवण्याचं भाग्य मला लाभलं. डॉ. विजय यांची बहीण शैलाताई यांचं आणि माझं नातंही बहिणी सारखंच राहिलं. स्वतः अपंग असून आई, आजी यांची सेवा करताना त्यांच्या चेहेऱ्यावरचा आनंद मी पाहत आले आहे. महेश–आनंद यांच्यावर झालेला रुग्णसेवेचा संस्कार माहेरहून जसा वडील, आजोबा यांच्याकडून आला तसाच तो शैलाताई, माणिकताईंकडूनही आला आहे; कारण शेवटी लहान मुलं मोठ्या व्यक्तींचं अनुकरण करतात.

रुग्णांच्या प्रति आपलेपणाचं नातं निर्माण करण्याचा हा वारसा आता माझ्या सुनांनीही वसा म्हणून स्वीकारलाय याचा मला नक्कीच आनंद वाटतो. आज प्रसूतिगृहासोबतच या हॉस्पिटलमध्ये बाल–दक्षता विभागही आहे जो डॉ. आनंदने स्वतःच्या मेहेनतीने, अभ्यासाने नवीन चालू केला आहे. त्यामुळे बदलत्या काळानुसार हॉस्पिटलमधील सेवा–सुविधाही बदलत गेल्या, सुधारत गेल्या. Yog in Pregnency, Diet in Pregnancy, Ultrasound scan, Mammography, IVF, Post Delivery Weight Loss या प्रसुतीशी निगडित सुविधा; तर बाल–दक्षता विभागाशी निगडित NICU, Lactation Counseling and Pediatric nutrition Counseling या सुविधा



आज उपलब्ध करून दिल्या आहेत. या सोबतच Staff Management Training ही प्रशिक्षण योजना याच हॉस्पिटलमध्ये कार्यान्वित करण्यात आली आहे. या सर्व सुविधांची देखभाल माझ्या दोन्ही सुना आवडीने करतात. हॉस्पिटल मध्ये दाखल होणाऱ्या सर्वांसाठीच आल्हाददायक ठरावं म्हणून वाजवलं जाणारं संगीत; तसेच हॉस्पिटलमधील स्वच्छता, आजूबाजूचा बगीचा यांचीही देखभाल वेळच्यावेळी घेतली जात असल्यामुळे इथे येणारा प्रत्येकजण याला हॉस्पिटल मानतच नाही. त्यांच्यासाठी त्यांचं हे तात्पुरतं दुसरं घरच होतं. माझ्या सासूबाई करत असलेल्या रुग्णसेवेत मी माझ्या परीने थोडी भर घालून हे सेवाक्षेत्र विस्तारलं; तर माझ्या सुनांनी या सोबतच एक पाऊल पुढे टाकत अधिकच्या वैद्यकीय सुविधा आणि हॉस्पिटलची व्यवस्थापन व हिशेबाची जबाबदारी

उचलली. कालानुरूप पिढ्यांच्या कामात बदल होत गेला तरी अंतिम ध्येय्य एकच राहिले – रुग्णसेवा. त्यासाठी मी स्वतः नव्यानं दाखल होणाऱ्या स्टाफशी संवाद साधते. या नव्या पिढीच्या स्टाफ मध्ये देखील हा संस्कारित बदल घडताना पाहून मला समाधान वाटते. कारण आपलं कर्तव्य हे सहजच वागणुकीतून घडत जातं.

बेडेकरांच्या घरातील पुरुषांच्या आणि स्त्रियांच्या या तीनही पिढ्या रुग्णसेवेचा वारसा अधिकच भर घालत जपत राहिल्या. रुग्णांना हॉस्पिटल मधून घरी पाठवतांना, 'अजून थोडे दिवस राहिलं तर चालेल का?' असा प्रश्न डॉक्टरांना विचारतात तेव्हाच आपण दिलेली सेवा त्यांना आवडली हे लक्षात येतं. या हॉस्पिटलमध्ये मिळणारा आपलेपणा, घरगुती वातावरण अजून काही दिवस अनुभवता यावा हीच त्यांची या मागची भावना असावी. या हॉस्पिटलमधून सेवा घेऊन गेलेली बाळंतीण खूप वर्षांनी आवर्जून फोन करून दडप्या पोह्यांची, शेवयांच्या उपम्याची रेसिपी विचारते तेव्हा आपण दिलेल्या पदार्थांची चव विस्मृतीत न गेल्याचा आनंद होतो. Oxford मध्ये स्थायिक झालेला एक भारतीय जेव्हा तिकडेच भेटला आणि त्याने आम्हाला ओळखल्यावर ''मी तुमच्याच हॉस्पिटलचं Product आहे असं सांगत होता'' तेव्हा ही मंडळी कुठे कुठे पोहोचली आहेत याचा आनंद होतो. जशा आमच्या घरच्या तीन पिढ्या या हॉस्पिटलशी निगडित आहेत तशाच या हॉस्पिटलमध्ये ३–४ पेशंट्सच्याही पिढ्या जोडल्या गेल्या आहेत. त्यांना भेटताना नक्कीच समाधान वाटते. डॉक्टर्स, स्टाफ आणि पेशंट्समधील नातं नक्कीच अधिक दृढ होतंय याचीही पावती मिळते.

या साऱ्या आनंद आणि समाधानामागे अपार मेहेनत असली तरीही त्याचे कधीही कष्ट वाटत नाहीत. आणि आता तर हे सहजपणे करण्याचं दैनंदिन व्रत होऊन चुकले आहे. यश हे शेवटी यशाच्या दिशेने जाताना आपण काय शिकलो यावरून ठरतं. नातेवाईक, विविध क्षेत्रांतील पाहुणे, मित्र–परिवार या सर्वांकडूनच संस्कारांचा बटवा मला मिळत गेला. माझ्या नातवंडांकडेही हे संस्कार संक्रमित होताना मी पाहते तेव्हा मला समाधान वाटते. उदा. चि. सोहम विचारतो, 'आजी, सूर्याला आंघोळ कोण घालतं?, मी तुमच्या खोलीत येऊ का?' हे सहजतेने कसं येतं? जान्हवी, गायत्री, रात्री 'भूप, जोग, बागेश्री' म्हणत माझ्याजवळ झोपतात. ६ महिन्यांचा जय शांतपणे विचार करून हसतो, मग कडेवर येऊन घट्ट मिठी मारत गाडीतून फिरायला येतो, न रडता. या नातवंडांच्या सहवासास अमृतच म्हणायचे ना! चि. जान्हवी, चि. गायत्री, चि. सोहम आणि चि. जय या नातवंडांच्या बालसुलभ प्रश्नांतूनही मला खूप शिकायला मिळतं, तेव्हा कृतकृत्य वाटतं.

डॉक्टरवरच्या श्रद्धेने रुग्ण दवाखान्यात येतात आणि विश्वासाने डॉक्टरांना जेव्हा प्रश्न विचारतात, चर्चा करतात तेव्हा देव आणि भक्ताचं अद्वैत जाणवतं. येताना एकटी येणारी बाळंतीण, जाताना आपल्या नवजात बालकाला कुशीत घेऊन या हॉस्पिटलचा निरोप घेते, तेव्हा कृष्णच गोकुळ सोडून जात असल्याची जाणीव होते! आणि मग हे हॉस्पिटल जणू एक मंदिरच असल्याचा साक्षात्कार होतो. या कार्यातही अडचणी या येतातच, पण यज्ञ समजून हे व्रत करत असल्यामुळे या अडचणींचीच आहुती या यज्ञात दिली जाते. आमच्या प्रसूतिगृहात



आलेल्या बाळंतिणीला रात्रीच्या वेळी निजताना संगीत ऐकवलं जातं. तणाव रहीत निद्रेसाठी या संगीताचा खूप उपयोग होतो.

लेकराला घेऊन आपल्या घरी निघालेल्या बाळंतिणीला तुळशीचं रोप आणि त्या माय–लेकरांचं पहिलं छायाचित्र निरोपादाखल भेट म्हणून देताना मन आनंदून जातं आणि 'काहीही लागलं तर माहेरपणाला या, मुलांना आजोळी आणा' असं म्हटलं जातं. तिच्या पाठमोऱ्या आकृतीकडे पाहताना मनाला वाटणारी हुरहूर काही काळासाठीच असते. कारण बागेला पाणी घालून पुन्हा हॉस्पिटल मध्ये येते, तेव्हा नव्यानं दाखल झालेल्या बाळंतिणीच्या चेहेऱ्यावरची भीती दूर करण्याचं आव्हान स्वीकारत डॉक्टर्स आणि स्टाफ पुन्हा आनंदाने कामाला लागतात आणि आदरातिथ्य करण्याचा आनंद पुन्हा आम्हा सर्वांना मिळतो.


सून सासू सून

सृजन म्हणजे निर्मिती! सुश्रुषालयात नवीन पिढी जन्माला येते तर मुद्पाकखान्यात अनेक नव्या पाककृती जन्म घेतात. या दोन नवनिर्मितीचा संगम म्हणजेच हा सृजन्य यज्ञ!

सर्व थोरांचे आशीर्वाद, पेशंट्सच्या सदिच्छा, 'शिवशक्ती'त सर्व नातेसंबंध असेच राहोत, असेच गोकुळ वात्सल्याने सदैव नांदू दे, हेच नारायणाकडे, परमेश्वराकडे प्रसाद म्हणून मागणे!

(गृहिणी, पाच पिढ्यांच्यात मध्यभागी असलेली)

**– सौ. सुमेधा वि. बेडेकर**





# आधारस्तंभ

मी भिवंडीच्या वझे कुटुंबातील कु. सुचेता, ठाण्याच्या बेडेकर कुटुंबातील सौ. सुमेधा झाले. गाव बदललं पण मला लाभलेलं घरपण तेव्हाही आणि आजही आनंदाचंच आहे. माझे सासरे डॉ. वा. ना. बेडेकर (ती. बाबा) यांनी मला सुनेपेक्षा मुलगी म्हणूनच स्वीकारलं. अगदी आमच्या लग्नात लक्ष्मीपूजनाच्या वेळी नवीन दागिना द्यायचा म्हणून स्वतः पु. ना. गाडगीळांच्या दुकानात जाऊन गळ्यातल्या 'चिंचपेट्या' आणल्या होत्या. बाळंतपणासाठी भिवंडीला गेलेल्या मला आत्यंतिक काळजीने त्यांनीच ठाण्याला आणले होते हेही मला आठवते. ती. बाबा घरात धोतर परिधान करत होते. सुरुवातीला मला ते नवीन वाटायचं. पण नंतर तो पेहेराव अंगवळणी पडला. सणासुदीला माझी मुलंही मग धोतर झब्बा जाकेट घालत असत. महाभारत, रामायण या सिरिअल्स पासून ते अगदी काल परवाच्या 'कौन बनेगा करोडपती' पर्यंतच्या मालिका आणि दूरचित्रवाणी वरून सादर होणाऱ्या सिनेमांमध्ये रमणारे बाबा घरातलं हवं नको हेही आत्मीयतेने पाहत असतं. भाजी मंडईतून भाजी आणणं, फळे आणणं, ताजा गरम स्वयंपाक बनवण्यात मदत करणं, शहाळ्याची लसुण चटणी स्वतः कुटून बनवणं, आंब्याच्या सिझनमध्ये पहिली आंब्याची पेटी आणून त्यातील आंबे स्वतः चिरून सर्वांना देणं हे त्यांचे खास छंद होते. पण त्याच बरोबर घरात कोणी नसेल त्यावेळी स्वतःचं स्वतः वाढून घेणं यातून त्यांच्यातला स्वावलंबन हा गुण मला प्रकर्षानं जाणवतो. अपरिमित कष्ट, कर्तव्याप्रती प्रामाणिकता या बरोबरच अपार मेहेनतीतून त्यांनी स्वतःचं विश्व निर्माण केलं आणि तेही हसत खेळत. वाचन, प्रवास याची त्यांना विलक्षण आवड. दरवर्षी मे महिन्यात आम्ही सर्व कुटुंबीय महाबळेश्वरला जायचो. माझे दोन्ही मुलगे अगदी लहान असताना (महेश तर ९ महिन्याचा होता) १९७५ साली आम्हा दोघांचा ३ आठवड्यांचा युरोप प्रवास झाला. तो केवळ 'सुमेधा, महेश लाघवी आहे, रडका नाही. त्याला आम्ही सांभाळू. तुम्ही दोघंही बिनदिक्कत जा.' असा ठाम विश्वास मला देणारे ती. बाबा मला कधी माझे सासरे वाटलेच नाहीत. पुढे तर नातवंड मोठी झाल्यावर त्यांना ऑस्ट्रलिया, अमेरिकेला घेऊन जाणारे बाबा दोन पिढ्यांचेच बाबा होते. घरात कुकिंग रेंज पासून ते व्हॅक्युम क्लीनर खरेदी करण्यासाठी ते माझ्या तसंच मुलांसोबत आनंदाने येत असत. घरात होणाऱ्या शाळा-कॉलेजच्या मिटींग्जच्या वेळी आलेल्या सर्वांना चहा देण्यासाठी मला मदत करणारे बाबा, घरगुती कार्यक्रमासाठी आलेल्या ४०-५० जणांकरिता आंब्याचा रस काढण्यापासून ते अगदी डाळिंब्या सोलण्यापर्यंत सगळ्या कामात आवडीने सहभागी व्हायचे. सामाजिक क्षेत्रात वावरणारे, बुद्धिमान डॉक्टर म्हणून ख्यातकीर्त असलेले ती. बाबा घरगुती कामात सुद्धा तेवढ्याच प्रेमानं सहभागी होताना मी पाहिले.

त्यांच्या आत्तेच्या (वेणाआत्या गोखले) लग्नात ते त्यांचा पाठीराखा म्हणून वेळणेश्वरला गेले होते. अवघ्या १० वर्षांचा असलेला हा पाठीराखा वेळणेश्वरसाठी तरी आमचा मार्गदर्शक ठरला हे माझ्या तेव्हा लक्षात आले जेव्हा वेळणेश्वरलाच महर्षी परशुराम अभियांत्रिकी महाविद्यालय सुरु झाले. मला तरी हा परमेश्वरी संकेतच वाटतो. या वेणाआत्या आमच्या घरी अधून मधून यायच्या. दिसायला सावळ्या, हसऱ्या, तुकतुकीत चेहेऱ्याच्या, थोडंसं पोक असणाऱ्या, मितभाषी, शांत, समाधानी वेणाआत्या आणि माझ्या आजेसासूबाई या देवासमोर गप्पा मारता मारता वाती वळत बसायच्या, पतवंडांशी खेळायच्या. त्यांच्यातच अधून-मधून माझ्या आत्तेसासुबाई - श्रीमती सत्यभामा वासुदेव फडके याही सहभागी व्हायच्या. त्यांची शंभरी झाली. 'सुमेधा आपण आल्याच्या वड्यांचा उद्योग करायचा का?' असं विचारणाऱ्या माझ्या या आत्तेसासुबाई माझ्यासाठी जणू उत्साहाची शिदोरी घेऊन आल्या. घरातले पाहुणे आणि मुलंबाळं या व्यापात व्यस्त असल्यानं मला या सर्वांशी संवाद साधण्यासाठी पुरेसा वेळ मिळत नसे. ती कमी माझ्या आत्तेसासुबाईंनी भरून काढली. एकत्रित मठात जाणे ते एकमेकींशी गप्पा मारणे हा सगळा या नणंदा-भावजयांचा आनंद सोहळा मी जवळून अनुभवला. आता पुढच्या पिढीतल्या आम्ही नणंदा-भावजया (मी, शैलाताई आणि सौ. माणिकताई) खेळीमेळीचा हाच वारसा आम्ही पुढे चालवीत आहोत याचा मला मनापासून आनंद आहे. माहेरी कन्या, बहिण आणि मग सासरी आल्यावर बायको, नातसून, सून, वहिनी, आई आणि आता विहीण, आजी आणि सर्वात महत्वाचं म्हणजे या सर्वांची मैत्रीण म्हणून माझा नात्यांचा गोफ आनंदात विणला गेला आहे. माझी नात जी गायत्री हिला मी 'आजी' म्हणून सांभाळलं पण तिचं भाग्य की तिला ८ पणजांचा सहवास मिळाला.

## अतिथी देवो भवः

घरातल्यांपासून ते पै पाहुण्यांपर्यंत अनेकांचं आगत-स्वागत या घराने केले. 'तुमचं घर म्हणजे चालतं-बोलतं विद्यापीठ' असं म्हणत आमच्या घरातीलच होणारे श्री. साने, तर 'वहिनी, तुम्ही जे आणाल ते आमच्यासाठीही आणा' असं म्हणत आमचे जणू नातलग बनलेले डॉ. नेने (दादुमिया) दांपत्य. राजापूरचे श्री. जोशी सर, श्री. ना. ग. गोरे, श्री. ग. प्र. प्रधान, सरन्यायाधीश श्री. चंद्रचूड दांपत्य, अर्थतज्ज्ञ श्री. वि. म. दांडेकर, पत्रकार आणि खासदार श्री. विद्याधर गोखले, श्री. ग. वा. बेहेरे, शिवशाहीर श्री. बाबासाहेब पुरंदरे, श्री. श्री. भी. वेलणकर, श्री. सिद्धार्थ बांदोडकर, श्री. वसंत बापट दांपत्य, श्री. श्रीकांत मोघे, श्रीमती दुर्गाबाई भागवत, श्री. रामभाऊ म्हाळगी, लेखक श्री. सुरेश खरे, साहित्यिका सरोजिनी वैद्य, श्री. पानसरे, श्री. तिनईकर,



अतिथी देवो भव

श्री. रिबेरो, श्री. दीपक घैसास, श्री. दीपक फाटक, श्री. बहुलकर, चाणक्य मालिकेतील डॉ. चंद्रप्रकाश, शेफ श्री. संजीव कपूर, Film institute चे श्री. प्रेम वैद्य, सौ. ए. के. जोशी इंग्रजी माध्यम शाळेच्या पहिल्या मुख्याध्यापिका रोशन पटेल मॅडम, संस्कृत पंडित एस. एस. शर्मा दांपत्य (जर्मनी), डॉ. गोडबोले दांपत्य, डॉ. आंबेकर दांपत्य (लंडन) अशा अनेकांनी आमच्या घरात पाहुणचार तर घेतलाच पण 'अतिथी देवो भवः' या न्यायानं या सर्वांचा पाहुणचार करण्याचा आनंद मला मिळाला हे आमच्या कुटुंबीयांच्या आयुष्यातील फार मोठं संचित म्हणावं लागेल. यापैकी काही मान्यवर आज हयात नाहीत. तरीदेखील त्यांच्या नावामागचे 'श्री' मी वगळणार नाही आणि 'कै.' देखील लिहिणार नाही; कारण इतकी ही मंडळी मनात जिवंतच राहणार आहेत.

पाहुणे म्हणून घरात येऊन, घरातलेच झालेल्या अनेकांमुळे आम्हा सर्वांना अपरिमित आनंद आणि आयुष्याला आणखीन चांगला वेगळा अर्थ प्राप्त झाला. या सर्वांच्या ऋणात राहणंच मला आवडेल. आम्हा सर्वांच्या आयुष्यातील हेच खरे आधारस्तंभ........!

**- सौ. सुमेधा वि. बेडेकर**

# Key to Success



तुझे नि माझे सेम टू सेम





It is very praiseworthy that the siblings Drs. Mahesh and Anand, are successful in their respective specialities. It is not just luck but their sincerity, hard work, vision, perseverance which has paved the way. Their specialities are complimentary to each other. There is good understanding between them and between their wives also. All four of them work together, share their problems and happiness together. We appreciate them not only for preserving the legacy of Bedekar Hospital but also for taking it to greater heights and their contributions in field of social service. Though both of them are born with a silver spoon in their mouth, they are very kind, gentle and respectful to one and all. Bedekars is a joint family. And in a joint family you learn to respect and accommodate every member of the member. Such complementarity is only available in a joint family. It is a great human value, which can be cultivated from childhood only in a joint family. We have seen, many successful businesses being destroyed due to internal rivalries or incompetence. We give our best wishes to both of them in all their future endeavours.

# Dr. Mahesh

Dr. Mahesh Bedekar is a young, eminent gynaecologist of Thane to reckon with. He is pursuing the great legacy of his grandfather, Dr. Bedekar, and the footsteps of his father, Dr. Vijay Bedekar, in the field of medicine and social work. Dr. Vijay Bedekar handed over the baton of Bedekar Hospital to Dr. Mahesh in 2005.

## Golden Days of Childhood

